जनतेचा आवाज...! अन्यायाविरुद्ध लढणारी पत्रकारिता...!
RNI No. MAHMAR/2023/89852

धाराशिव स्पेशल वार्ता

08 ऑगस्ट 2026 शुक्रवार
आवाज जनतेचा...! हक्क सत्याचा...!
संपादक : रामेश्वर डोंगरे

सायबर गुन्ह्यांपासून विद्यार्थी सजग होणार !

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूरचे सायबर सुरक्षा अभियानाचा धडाका!

Quick Heal Foundation च्या "Cyber Shiksha for Cyber Suraksha" अभियानांतर्गत
लातूरमधील शाळांमध्ये सायबर सुरक्षेबाबत प्रभावी जनजागृती

सायबर धोक्यांपासून सावधान!

- ऑनलाईन फसवणूक
- फिशिंग व बनावट लिंक
- OTP फसवणूक
- QR कोड स्कॅम
- सोशल मीडिया गैरवापर
- सायबर बुलिंग
- वैयक्तिक माहितीची चोरी
- डीपफेक आणि AI चा गैरवापर



सायबर सुरक्षितोसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील विद्यार्थ्यांकडून Quick Heal Foundation यांच्या "Cyber Shiksha for Cyber Suraksha" या राष्ट्रीय जनजागृती अभियानांतर्गत लातूर शहरातील विविध शाळांमध्ये सायबर सुरक्षा विषयावर जनजागृती सत्रे आयोजित करण्यात येत आहेत.

आजच्या डिजिटल युगात लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वजण मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वापर करत आहेत. मात्र, ऑनलाईन फसवणूक, सायबर गुन्हे, बनावट लिंक, फिशिंग, OTP फसवणूक, QR कोड स्कॅम, सोशल मीडिया गैरवापर आणि वैयक्तिक माहितीची चोरी यांसारख्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत.

या अभियानामध्ये विद्यार्थ्यांना मजबूत पासवर्ड, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, वैयक्तिक माहिती कोणासोबतही शेअर न करणे, ऑनलाईन गेमिंगमधील धोके, सायबर बुलिंग, डिजिटल फुटप्रिंट, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि डीपफेक याबाबत माहिती तसेच सायबर गुन्हा झाल्यास तक्रार कशी करावी याबाबत मार्गदर्शन करण्यात येते.

ही सत्रे संवादात्मक स्वरूपाची असून प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल जबाबदारीची अणीक निर्माण होत आहे. या उपक्रमाचा उदेश प्रत्येक विद्यार्थ्याला सजग आणि जबाबदार डिजिटल नागरिक बनवणे हा आहे.

विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवा!

- मजबूत पासवर्ड तयार करा
- वैयक्तिक माहिती कुणांशीही शेअर करू नका
- अनोळखी लिंकवर क्लिक करू नका
- OTP, PIN, पासवर्ड कोणालाही सांगू नका
- QR कोड स्कॅन करण्याआधी खात्री करा
- सायबर गुन्हा झाल्यास त्वरित तक्रार करा (1930)

सायबर क्राईम हेल्पलाईन
1930
www.cybercrime.gov.in

संवादात्मक सत्रे — प्रश्नोत्तर व प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे विद्यार्थ्यांची शंका समाधान

डिजिटल जबाबदारी — सुरक्षित इंटरनेट वापराची सवय विकसित

सजग डिजिटल नागरिक — सायबर धोक्यांपासून स्वतःचे आणि समाजाचे संरक्षण

राष्ट्रीय उपक्रम — Quick Heal Foundation चा महत्त्वपूर्ण सामाजिक उपक्रम

राजर्षी शाहू महाविद्यालयातील विद्यार्थी स्वयंसेवक हा उपक्रम उत्साहाने राबवत असून
लातूरमधील अनेक शाळांमध्ये सायबर सुरक्षेची जनजागृती सातत्याने सुरु आहे!

जनतेचा आवाज
अन्यायाविरुद्ध लढणारी पत्रकारिता
रामेश्वर डोंगरे
मुख्य संपादक
जनतेचा आवाज / धाराशिव स्पेशल वार्ता
मोबाईल
91 75 32 57 08
E-mail : janatechaawaznews@gmail.com

सायबर सुरक्षा हीच आजची गरज !
सजग रहा, सुरक्षित रहा !

🚨 सायबर गुन्हेगारांनो सावधान! लातूरमध्ये विद्यार्थ्यांनी उभारला डिजिटल सुरक्षेचा जागर — शाळा-शाळांमध्ये 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' अभियानाचा धडाका

जनतेचा आवाज विशेष

✍️ रामेश्वर डोंगरे यांच्या लेखणीतून

लातूर : आजच्या डिजिटल युगात मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाशिवाय जीवनाची कल्पनाच करणे कठीण झाले आहे. मात्र या तंत्रज्ञानाच्या वापराबरोबरच ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, बनावट लिंक, OTP आणि QR कोड स्कॅम, सोशल मीडियाचा गैरवापर, सायबर बुलि[illegible]ा सायबर

janatechaawaznews.blogspot.com